N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): जालना **P.S.**(ठाणे): अंबड

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0050 **Year** (वर्ष): 2025

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):01/02/2025 02:36

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार **Date From** (दिनांक पासून): 31/01/2025

**Time Period** (कालावधी): पहर 6 **Date To** ( दिनांक पर्यंत): 31/01/2025

**Time From** (वेळेपासून): 18:08 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 18:08 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 01/02/2025 **Time** (वेळ): 02:23 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 002

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 01/02/2025 02:23 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पूर्व, 1 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): sdm कार्यालय अंबड,अंबड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अमोल आत्माराम मोरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1996

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिंदेवडगाव ता घनसावंगी जिल्हा,घनसावंगी,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शिंदेवडगाव ता घनसावंगी जिल्हा,घनसावंगी,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8208243424

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | देवानंद कारभारी डोईफोडे | | | 1. सोरटी नगर, अंबड रोड जालना ,तालुका जालना,जालना, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय रुपया | 2,000/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लावेची. | 2,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी अमोल आत्माराम मोरे वय 29 वर्ष, व्यवसाय – शेती व उसतोडी कामगार रा. शिंदेवडगाव ता. घनसावंगी जिल्हा जालना मोबाईल नंबर 8208243424

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, आज दिनांक 31.01.2025 रोजी मी अंबड शहराजवळील गजानन महाराज मंदिराजवळ समक्ष हजर राहुन पोलिस निरिक्षक श्री.मुटेकर यांच्याकडे लेखी तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी माझी पत्नी गिता, मुलगा आर्यन वय 9 वर्ष व स्वप्नील वय 5 वर्ष यांच्या सोबत राहण्यास आहे. माझा मोठा मुलगा आर्यन हा इयत्ता 3 री मध्ये जिल्हा परिषद शाळा वंजारवाडी ता. बदनापुर जि. जालना येथे त्याचे आजीकडे शिकण्यास आहे. माझा मुलगा आर्यन अमोल मोरे याचा भिल्ल जातीचा दाखला काढण्यासाठी मी दिनांक13.09.2023 रोजी घनसावंगी तहसिल कार्यालयातील महाईसेवा केद्रामध्ये ऑनलाईन फॉर्म भरला होता. त्यावेळी मी सदर फॉर्मची 57.20 /- रुपये फि ऑनलाईन भरली होती. त्यानंतर दिनांक 26.06.2024 रोजी मी आमचे गावचे तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक व तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील यांच्या भिल्ल जमातीचे दाखल्या बाबत गृहभेटी अहवालावरती सहया घेवुन तो उपविभागीय अधिकारी कार्यालयात जातीचे दाखल्याचे काम पाहणारे श्री. देवानंद डोईफोडे साहेब यांच्याकडे जमा केला होता. त्यानंतर मी माझे पत्नीसह उसतोडी चे काम करण्याकरीता कर्नाटकातील उस कारखाण्यावरती कामास गेलो.

उसतोडीवरुन गावी परत आल्यानंतर मी आज दिनांक 31.01.2025 रोजी सकाळी 11.00 वाजण्याचे सुमारास उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे जावुन जातीच्या दाखल्याचे काम पाहणारे श्री. देवानंद डोईफोडे साहेब यांना भेटलो. त्यावेळी त्यांनी मला माझे मुलाचे दाखल्याची फाईल साहेबांपुढे पुटअप करण्यासाठी 3,000/- रुपये मागीतले. मला देवानंद डोईफोडे यांना लाचेचे पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे फोन करुन लाच मागणी बाबतची माहीती दिली व माझी तक्रार घेण्यासाठी अंबड येथे येण्यास सांगीतले. माझा व उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथील श्री.देवानंद डोईफोडे साहेब यांच्या मध्ये कोणताही वादविवाद नाही तसेच पैशाबाबत कोणताही उसनवारीचा अथवा आर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही.
आज दिनांक 31.01.2025 रोजी मी उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे जावुन माझा मुलगा कु.आर्यन अमोल मोरे याचे भिल्ल या जातीच्या दाखल्या साठी दाखल केलेल्या फाईल बाबत जातीच्या दाखल्याचे कामकाज पाहणारे वरिष्ठ लिपिक श्री. देवानंद डोईफोडे साहेब यांना भेटुन माझे मुलाचे जातीच्या दाखल्याबाबत विचारपुस करणार आहे. त्यावेळी वरिष्ठ लिपिक श्री. देवानंद डोईफोडे यांनी स्वत: अथवा इतरामार्फत मला पैशाची मागणी केल्यास त्यांच्या वरती कायदेशीर कारवाई करावी म्हणुन तक्रार देत आहे. अशी लेखी तक्रार दिली. तक्रारीसोबत मी माझा मुलगा आर्यन अमोल मोरे याचा भिल्ल या जातीचा दाखल मिळण्याकरीता ऑनलाईन दाखल केलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत व मुलगा आर्यन मोरे याचे भिल्ल जमातीचे दाखल्या बाबत गृहभेटी अहवालावरती आमचे गावचे तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक व तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील यांच्या सहया घेवुन तो उपविभागीय अधिकारी कार्यालयात दाखल केलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत दिली.

त्यानंतर मी दिलेली तक्रार खरी आहे काय? याची खात्री व पडताळणी करण्यासाठी माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर देवून मला पंच क्र. 01 श्री. रामेश्वर घोडके यांचे सोबत उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे श्री. देवानंद डोईफोडे यांची भेट घेण्यास पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.
त्यानंतर माझ्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री.मुटेकर यांनी सोबत आणलेल्या साहीत्यातून एक नवीन मेमरी कार्ड काढुन डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मशिन मध्ये मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डींग चालु करुन व्हाईस रेकॉर्डींग मशिन कोणालाही दिसणार नाही अशा रितीने माझ्या कंबरेच्या करदुडयाला बांधुन पॅन्टच्या आतील खिशात ठेवण्यात आली. त्यानंतर मी व पंच क्र. 01 श्री. घोडके असे आम्ही दोघे जण माझ्या

मोटार सायकलने उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे गेलो. त्या ठिकाणी मी पंचासमक्ष श्री. देवानंद डोईफोडे साहेब बसले असलेल्या रुममध्ये जावुन भेटलो. त्यावेळी मला श्री. देवानंद डोईफोडे साहेब म्हणाले की, बाहेर येतो मी.. काय देता तुम्ही. त्यावेळी मी त्यांना म्हणलो की, भाउ म्हणला काही कमी होईन का तीन हजार लई होतात. त्यावेळी मला श्री. देवानंद डोईफोडे साहेब म्हणाले की, आलो मी बाहेर करुन घ्या असे म्हणाले. त्यानंतर मी बाहेर आलो व तेथुन पंचासमक्ष पोलीस निरिक्षक मुटेकर थांबले असलेल्या गजानन महाराज मंदिरा जवळ परत आलो. त्या ठिकाणी पोलीस निरिक्षक मुटेकर साहेब यांनी पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डिंग मधील आमचे बोलणे ऐकले. त्यानंतर आमच्या सर्वानुमते पुन्हा एकदा मला वरिष्ठ लिपिक श्री.देवानंद डोईफोडे यांची भेट घेण्यास पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डीग चालु करुन व्हाईस रेकॉर्डीग मशिन कोणालाही दिसणार नाही अशा रितीने माझ्या शर्टच्या आत बनियनला बांधण्यात आली. त्यानंतर मी व पंच क्र. 01 श्री. घोडके असे आम्ही दोघे जण माझ्या मोटार सायकलने उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे गेलो. त्या ठिकाणी गेल्यानंतर मी श्री. देवानंद डोईफोडे साहेब बसले असलेल्या रुममध्ये जावुन त्यांना भेटलो. त्यावेळी मला श्री. देवानंद डोईफोडे साहेब म्हणाले की, बोलना. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, ते रक्कम किती काय दयायचे. त्यावेळी देवानंद डोईफोडे साहेब म्हणाले की, करुन टाका ना काय हय त. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, सांगा ना तुम्ही. त्यावेळी मला देवानंद डोईफोडे साहेब म्हणाले की, दोनच करु टाका बेस्ट. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, दोन हजार का. त्यावेळी मला देवानंद डोईफोडे साहेब म्हणाले की, हो . त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, ते निघाना ना त्याच्या मुळ प्रॉब्लम व्हा लागला ना आजच्या आज करुन दया तेवढ. त्यावेळी मला देवानंद डोईफोडे साहेब म्हणाले की, बर बर करुन देतो.. आजच्या आज करुन देतो.

त्यानंतर मी व पंच श्री. घोडके असे मोटार सायकलने गजानन महाराज मंदिरा जवळील गोपनिय ठिकाणी परत आलो. तेथे आल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. मुटेकर साहेब यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझेसोबत वरिष्ठ लिपिक श्री. देवानंद डोईफोडे यांचे झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. मुटेकर साहेब यांनी आम्हाला सापळा कारवाई बाबत सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक मुटेकर यांनी सापळा कारवाई साठी माझे जवळील मी स्वकष्टाने कमवलेले 2,000/-रु. घेतले. पोलीस निरीक्षक श्री. मुटेकर यांनी मला व पंचाना ॲन्थ्रासिन पावडर बाबत माहीती देवुन सदर 500 रुपये दराच्या चार चलनी नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावुन त्याबाबतचे गुणधर्म समजावुन सांगीतले. त्यानंतर सदर 2,000/-रु. च्या लाचेच्या नोटा माझ्या अंगातील पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवण्यात आल्या व मला सुचना दिली की, उपविभागीय अधिकारी कार्यालयातील वरिष्ठ लिपिक श्री. देवानंद डोईफोडे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर दर्शनी भागात येवुन सापळा पथकास स्पष्ट दिसेल अशा रितीने डाव्या हाताने शर्टच्या उजव्या हाताची बाही वरती करुन लाचेची रक्कम स्विकारले बाबत सापळा पथकास इशारा देण्याचे सांगीतले. त्यानंतर पुन्हा व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन व्हाईस रेकॉर्डर कापडी पिशवीत टाकले ती कापडी पिशवी माझे शर्टच्या आतील बाजुस बनियनला बांधुन मला व पंच क्रं. 01 श्री. घोडके यांना मोटार सायकलने उपविभागीय अधिकारी कार्यालय अबड येथे जावुन वरिष्ठ लिपिक श्री. देवानद डोईफोडे यांना भेटण्यासाठी पाठविले. आमचे पाठीमागे सापळा पथक देखील कोणालाही संशय येणार नाही अशा रितीने आले. मी व पंच क्रं. 01 श्री. घोडके असे उपविभागीय अधिकारी कार्यालय अबड येथे आलो. त्या ठीकाणी सापळा पथकाने कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सापळा लावला.

त्यानंतर मी व पंच श्री. घोडके असे उपविभागीय अधिकारी कार्यालयात गेलो. त्या ठिकाणी मला वरिष्ठ लिपिक श्री. देवानंद डोईफोडे हे त्यांचे कक्षाचे बाहेरील पाण्याचे जार जवळ पंचासमक्ष भेटले. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, साहेब मायला किती दिवस झाले ना असे म्हणुन मी माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम 2,000/- रुपये उजव्या हाताने काढुन वरिष्ठ लिपिक श्री.देवानंद डोईफोडे यांना दिली व म्हणालो की, दोन हजार हयत मोजुन घ्या. त्यावेळी वरिष्ठ लिपिक देवानंद डोईफोडे मला म्हणाले की, काही अडचण नाही असे म्हणुन वरिष्ठ लिपिक श्री.देवानंद डोईफोडे यांनी पंचासमक्ष माझ्याकडुन त्यांचे उजव्या हाताने लाचेची रक्कम 2,000/- रुपये रक्कम स्विकारुन त्यांचे अंगातील पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे दर्शनी भागात येवुन सापळा पथकास स्पष्ट दिसेल अशा रितीने माझे डाव्या हाताने शर्टच्या उजव्या हाताची बाही वरती करुन लाचेची रक्कम वरिष्ठ लिपिक श्री.देवानंद डोईफोडे यांनी स्विकारले बाबत सापळा पथकास 18.08 वाजेच्या सुमारारास इशारा केला. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवुन लगेच त्यांनी वरिष्ठ लिपिक श्री. देवानद डोईफोडे यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले.

तरी उप विभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे काम करणारे वरीष्ठ लिपिक देवानंद कारभारी डोईफोडे यांनी माझा मुलगा आर्यन अमोल मोरे यांचे भिल्ल जातीचे प्रमाणपत्राची फाईल साहेबांपुढे ऑनलाईन पुटअप करण्यासाठी दिनांक 31.01.2025 रोजी उप विभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे पंच क्र. 01 श्री. घोडके यांचे समक्ष मला दोन

हजार रुपये लाचेची मागणी करुन दिनांक 31.01.2025 रोजी 18.08 वाजेच्या सुमारास उप विभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे पंच क्र. 01 श्री. घोडके यांचे समक्ष माझ्याकडून ॲन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची 2000 रुपये रक्कम देवानंद डोईफोडे यांनी उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे अंगातील पॅन्ट च्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशात ठेवली असतांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणुन माझी उप विभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे काम करणारे वरीष्ठ लिपिक देवानंद कारभारी डोईफोडे यांचे विरुद्ध कायदेशिर फिर्याद आहे.

माझी फिर्याद संगणकावरती टंकलिखित करण्यात आली असुन त्याची प्रिंट काढुन ती मी वाचुन पाहीली असता मी सांगीतले प्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SATISH SHIVAJI JADHAV(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.) [signature]

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

[signature]

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature]

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

पोहेकॉ/739 पु.पु. मलटाकर
अं. पो. स्टे. अंबड